# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : सीए/ ३८८

दिनांक : १२ मे, २०१७

**तातडीचे व महत्वाचे**

मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व
व्यवस्थापनशास्त्र.

विषय : सादर केलेल्या स्वमूल्यमापन अहवालाबाबत....

संदर्भ : या विभागाचे पत्र क्र. सीए/३२०, दि. १३ एप्रिल, २०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्थांनी 'स्वमूल्यमापन अहवाल' दि. २० एप्रिल, २०१७ पर्यंत शैक्षणिक विभागात सादर करण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते. त्यानुसार आपल्या महाविद्यालयांची / संस्थांची माहिती शैक्षणिक विभागास प्राप्त झाली. तथापि सदर माहितीची शहानिशा केली असता त्यामध्ये खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

१. 'स्वमूल्यमापन अहवाल' (SAR) मधील माहिती अपूर्ण असून विशेषत: रकाना क्र. ९ मधील (Approved / Not Approved Teacher Details) माहिती अपूर्ण आहे.
२. बऱ्याच महाविद्यालयांनी SAR व EOA सादर केले नाहीत.
३. 'स्वमूल्यमापन अहवाल'मध्ये अभ्यासक्रमनिहाय शिक्षकांची माहिती दिलेली नाही.
४. प्राचार्य / संचालक / शिक्षकांच्या विद्यापीठ मान्यतेविषयी माहिती सदोष / अपूर्ण आढळून आली.
५. एकाच शिक्षकाचे नाव एकाहून अधिक अभ्यासक्रमांसाठी दर्शविलेले आहे.
६. काही शिक्षकांची मान्यतापत्रे ते पूर्वी कार्यरत असलेल्या महाविद्यालयांची आहेत.

तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाचे/संस्थेचे प्राचार्य/संचालक व शैक्षणिक विभागाकडे स्वमूल्यमापन अहवालाची माहिती सादर केलेल्या संबंधित जबाबदार व्यक्तीने खालील तक्त्यात नमूद केलेल्या दिनांकास व वेळेनुसार आवश्यक ती कागदपत्रे घेऊन संबंधित समितीपुढे हजर राहावे.

| अ.क्र. | जिल्हा | वार व दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | पुणे शहर<br>पुणे ग्रामीण | बुधवार, दि. १७ मे, २०१७ | सकाळी ११.००ते २.००<br>दुपारी २.३० ते ५.०० |
| २. | अहमदनगर<br>नाशिक | गुरूवार, दि. १८ मे, २०१७ | सकाळी ११.००ते २.००<br>दुपारी २.३० ते ५.०० |
| ३. | राखीव | शुक्रवार, दि. १९ मे, २०१७ | सकाळी ११.००ते ४.०० |

कळावे,

आपला,

१२/५/१७

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)